# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/09/2023 (मंगळवार) दुपार


---

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर बायपास चौक उमरेड येथे दि. ०२/०९/२०२३ रोजी दुपारी १.०० वा. दरम्यान प्रशांत प्रभाकर आंटे हा घरी हजर असताना त्याचे घराजवळ राहत असलेला मृतक दिगांबर दादाजी देवगळे यांनी सांगीतले कि, माझे मुलाची एस. टी. बसची पास संपल्याने पास काढण्या करीता पैसे नसल्याने सोयाबिन विकण्या करीता मृतक दिगांबर हा प्रशांतचे मोटरसायकल क्र. एम. एच.— ४९/ ए. एन.— ८१२८ हिरो होन्डा स्प्लेन्डरने बेसुर येथुन सोयाबिनची चुमडी घेवुन उमरेड येथे आले व सोयाबिन विकुन सोयाबिनचे पैसे घेवुन बेसुर येथे बायपास मार्गाने परत जात असताना मृतक दिगांबर याला त्याचे मित्राला भेटायचे असल्याचे सांगुन प्रशांतला गाडी नागपुर रोडने घेण्यास सांगीतले, तेव्हा प्रशांत याने मोटरसायकल बायपास येथे थांबवुन गावातील गफार तुरक याला फोन करून बायपास रोडवर भेटण्या करीता बोलावले तेव्हा गफार तुरक व राष्ट्रपाल निकोसे रा. आंबेडकर लेआउट उमरेड हे राष्ट्रपालचे मोटरसायकलने प्रशांत याला भेटण्याकरीता बायपास रोडवर आले. दोघासोबत भेट घेवुन मृतक दिगांबर व प्रशांत नागपुर रोडने मित्राला भेटण्याकरीता निघुन गेले व गफार तुरके व राष्ट्रपाल निकोसे यांना सुध्दा डब्ल्यु. सि. एल येथे काम असल्याने त्याचे मागे निघाले. मृतक दिगांबर व प्रशांत हा गोल्डन हॉटेल जवळ लधवे लेआउटकडे जाणारा रोड जवळ आले असता बकरी आडवी आल्याने प्रशांत कडुन आपली मोटरसायकल नियंत्रित न झाल्याने बकरीला मोटरसायकलची जोरदार धडक मारली त्यामुळे गाडी वरून मृतक दिगांबर व प्रशांत आटे हे दोघेही खाली पडले. तेव्हा त्याचे मित्र नामे— गफार तुरके व राष्ट्रपाल निकोसे हे आपले मोटरसायकलने पाठीमागुन डब्ल्यु. सि. एल येथे जात असता रोडवर मृतक दिगांबर व प्रशांत घाटे हा अपघात होवुन खाली पडलेला दिसला. तिथे थांबुन पाहिले असता दिगांबर याचे डोक्याला मार लागलेला होता व प्रशांतला सुध्दा उजव्या हाताला मार लागला होता. तेव्हा राष्ट्रपाल याने मृतक दिगांबर हा बोलत नसल्याचे पाहुन लगेच प्रशांत आटे यांचे मोटरसायकलवर मृतक दिगांबर याला बसवुन सरकारी हॉस्पीटल उमरेड येथे उपचाराकरीता घेवुन आले. मृतक दिगांबर यांचेवर तेथिल डॉक्टरांनी उपचार करून त्याची प्रकुती जास्त खराब असल्याने त्याला मेडिकल येथे रेफर केले तेव्हा प्रशांत, गफार व राष्ट्रपाल असे मिळुन दिगांबर याला ॲम्बुलंसने नागपुर येथे घेवुन गेले व मृतक दिगांबर याला ट्रामा सेंटर नागपुर येथे भर्ती केले व मृतक दिगांबर देवगडे, वय ५९ वर्ष रा. बेसुर ता. भिवापुर जि. नागपुर हा ०७.४५ वा. दरम्यान उपचार चालु असतांना मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सरतर्फे नापोशि/आशिष हिरूडकर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ अ भादवी सहकलम ३/१८१, १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार आलम मो. क्र. ९७६७५४५४३८ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर